हळव्या मनाचा आमदार पोहोचला भाजीमंडीत
>>पान 2

ईव्हीएम विना निवडणुका घेऊन बघा तुमची ताकद कळेल : इम्तियाज जलील यांचा महायुतीला इशारा
>>पान 3

'विकसित भारत यंग लीडर्स' चर्चासत्रात युवकांनी सहभाग घेण्याचे आवाहन
>>पान 4

**सुविचार**
यशासाठी समर्पण आणि संयम महत्त्वाचे आहेत.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 110 ■ शनिवार, दि. 30 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या घरावर ईडीचा छापा
आतील पान

# गोंदिया-कोहमारा मार्गावर शिवशाही बसचा भीषण अपघात; ११ जणांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** सडक/अर्जुनी, कोहमारा मार्गे गोंदियाला जात असलेल्या शिवशाही बसला झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाशांची संख्या ११ वर गेली आहे. हा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी ते गोंदिया मार्गावर डव्वा गावाजवळ शिवशाही बस (क्रमांक एम.एच.०९ इ एम १२७३) उलटून अपघात झाला. सुरुवातीला त्यात ८ प्रवासी मृत्यूमुखी पडले असे सांगण्यात आले होते. पण हा आकडा आता ११ वर गेला आहे. सुमारे ३० प्रवासी गंभीर जखमी झाले आहे. हा अपघात शुक्रवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास गोंदिया-कोहमारा मार्गावरील डव्वा जवळ झाला.

मिळालेल्या माहितीनुसार गोंदिया येथे बस उलटल्यानंतर आतापर्यंत ११ मृतदेह ग्रामस्थांद्वारे बसमधून बाहेर काढण्यात आले. भंडारा-गोंदिया ही शिवशाही बस दुपारी भंडाऱ्याहून गोंदियाकडे येथे होती. बस चालकाने एका दुचाकीला ओव्हरटेक करताना



त्याचे बसवरील नियंत्रण सुटले व ती उलटली. जवळपास २० फूट रस्त्यापासून बाजूला घासत गेली. त्यामुळे बसमधील ११ प्रवाशांचा मृत्यू झाला. ३० प्रवासी जखमी झाले. जखमी प्रवाशांची संख्या अधिक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मृतदेह गोंदिया येथील शासकीय महाविद्यालयात आणले असून गंभीर जखमींना गोंदिया शासकीय महाविद्यालयात दाखल केले जात आहे.

अपघाताची बातमी कळताच डव्वा येथील गावकऱ्यांनी अपघातस्थळी धाव घेत बसमध्ये अडकून पडलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. तसेच १०८ रुग्णवाहिका बोलावून त्यांना गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच डुग्गीपारचे पोलीस निरीक्षक पथकासह घटनास्थळी दाखल झाले व मदत कार्याला सुरुवात केली. जखमी व मृतक प्रवासी हे गोंदिया जिल्ह्यातीलच असल्याची शक्यता आहे.

दरम्यान भीषण अपघातामुळे गोंदिया-कोहमारा मार्गावरील वाहतूक काही काळापूर्ती ठप्प झाली होती. गोंदिया जिल्हा वाहतूक पोलिसांनी लगेच घटनास्थळी दाखल होत या मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या घटनेची माहिती मिळताच गोंदियाचे नवनिर्वाचित आमदार विनोद अग्रवाल माजी आमदार राजेंद्र जैन शासकीय महाविद्यालयात पोहोचले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर भंडारा आगारातील प्रशासकीय पथक पण घटनास्थळी दाखल झालेले आहे.

## गोंदिया बस अपघात पंतप्रधानांकडून मृतांच्या कुटुंबियांना मदतीची घोषणा

नवी दिल्ली, २९: महाराष्ट्रातील गोंदिया येथे झालेल्या भीषण बस अपघातात मृत पावलेल्या प्रवाशांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. पंतप्रधानांनी 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी' तून मृतांच्या कुटुंबियांसाठी २ लाख रुपयांची मदत तर जखमी झालेल्या प्रवाशांसाठी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

या दु:खद घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यम एक्स वर लिहिले: गोंदिया, महाराष्ट्र येथे झालेल्या बस अपघातात जीवितहानी झाल्यामुळे अत्यंत व्यथित आहे. जखमींनी लवकर बरे व्हावे, हीच प्रार्थना. स्थानिक प्रशासन सर्वतोपरी मदत करत आहे. मृतांच्या कुटुंबियांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये देण्यात येतील. गोंदिया दुर्घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून, पंतप्रधानांनी या कठिण प्रसंगी शोकाकुल कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहत आर्थिक मदत घोषित केली आहे.

## बस अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची मदत - मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनीजवळ शिवशाही एसटी बसला झालेल्या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना एसटी महामंडळामार्फत १० लाख रुपयांची मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गोंदिया जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून या अपघातासंदर्भात माहिती घेतली. अपघातातील सर्व जखमींना त्वरित चांगल्या दर्जाचे उपचार देण्यात यावेत, आवश्यकता वाटल्यास जखमींना खासगी रुग्णालयात दाखल करावे, अशा सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. जखमींवर शासकीय खर्चातून मोफत उपचार करण्यात यावेत, अशी सूचनाही त्यांनी दिली. अपघाताची घटना अत्यंत दुर्दैवी असून मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

## शेवटच्या तासात लाखोंच्या संख्येने मतदान कसं वाढलं?, मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितलं खरं कारण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक झाल्यानंतर जो निकाल लागला त्यावर आता महायुतीमधील पक्ष सोडले तर इतर विरोधक टीका करत आहेत. मविआचे घटक पक्ष, मनसे आणि वंचित बहुजन आघाडी व अपक्षांनीही निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहेत. विशेष करून सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले होते. मग रात्री साडेअकरा वाजेपर्यंत ६५.२ टक्के मतदान कसे झाले? असा प्रश्न विरोधी पक्षाच्या वतीने उपस्थित करण्यात येत आहेत. यावर आता केंद्रीय निवडणूक आयोगाचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी स्पष्टीकरण दिले आहे.



एस. चोक्कलिंगम म्हणाले की, सायंकाळी शेवटच्या तासात मतदानाचा टक्का वाढणे हे सामान्य आहे. निमशहरी आणि शहरी भागात शेवटच्या काही तासात मतदार मोठ्या प्रमाणात बाहेर पडतात. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढतो. शेवटच्या तासात जवळपास ७.८ टक्के मतदान वाढले आहे. यावर बोलताना चोक्कलिंगम यांनी सांगितले की, ''सायंकाळी सहा वाजण्याची आधी जो मतदार रांगेत येऊन उभा राहतो, त्याचे मतदान संपेपर्यंत मतदानाची प्रक्रिया सुरूच राहते. ही रांग संपण्यासाठी कधी कधी सहा वाजण्याची मर्यादाही पुढे जाते. २०१९ साली सायंकाळी ५ वाजता जवळपास ५४.४ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर अंतिम मतदानाची आकडेवारी ६१.१ टक्के झाली होती.

एस. चोक्कलिंगम यांनी एक्स या सोशल नेटवर्गिक साईटवर सविस्तर माहिती दिली आहे. महाराष्ट्रातील शहरी आणि निमशहरी भागात शेवटच्या तासांत अनेक मतदार बाहेर पडून मतदान करत होते, असेही त्यांनी सांगितले.

# अमित शाह यांची महायुती नेत्यांसोबत अडीच तास खलबतं, पण तरीही ठरेना महाराष्ट्राचा मुख्यमंत्री ?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री कोण असणार? महायुतीतील घटक पक्षांना मंत्रिमंडळात कुठली खाती मिळणार? एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री पद स्वीकारणार? की मुलगा, खासदार श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्री करणार? अशा अनेक प्रश्नांवर गुरुवारी रात्री दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी महायुतीच्या तिन्ही प्रमुख नेत्यांसोबत झालेल्या बैठकीत खलबतं रंगली. या बैठकीला एकनाथ शिंदे, देवेंद्र फडवणीस, अजित पवार यांच्यासह भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा हे सुद्धा उपस्थित होते. या मॅरेथॉन बैठकीत सुद्धा अंतिम तोडगा निघाला नसून आज शुक्रवारी मुंबईतही महायुतीच्या नेत्यांची बैठक होणार आहे.

भाजपा विधिमंडळ आमदारांची आज बैठक : २३ नोव्हेंबरला १५व्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला असून यात जनतेनं महायुतीला एकहाती कौल दिला. असं असलं तरी ६ दिवस होऊनही राज्यात सरकार स्थापन होत नाही. मुख्यमंत्री पदाच्या नावावर घोड अडलं असल्यानं इतर चर्चा पुढं सरकत नाही. गुरुवारी रात्री नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांच्यात या विषयावर अडीच तास चर्चा रंगली. तरीही महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाबाबत अंतिम निर्णय होऊ शकला नाही. आज मुंबईत महायुतीच्या नेत्यांची पुन्हा बैठक होणार आहे. यासोबतच भाजपा विधिमंडळ आमदारांची बैठक होणार असून यामध्ये विधिमंडळ नेता ठरवला जाणार आहे.

चर्चा उघड केली जात नाही : महायुतीच्या नेत्यांची अमित शाह आणि जे पी नड्डा यांच्यासोबत बैठक होण्यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी दीड तास अजित पवार यांच्यासोबत दिल्लीत चर्चा केली. त्यानंतर जे पी नड्डा आणि अमित शाह यांच्यातही तासभर चर्चा झाली. त्यानंतर एकत्रित झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री पद, मंत्रिमंडळ विस्तार, मंत्रिमंडळ विस्तारासाठी महायुतीत फॉर्मुला कुठला असणार, खातेवाटप, शपथविधीची तारीख या सर्व विषयांवर चर्चा झाली. परंतु ही चर्चा उघड करण्यास काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नकार दिला. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, ''बैठक सकारात्मक झाली असून पुढील बैठक आता मुंबईत होणार आहे. मी कुठंही नाराज नाही. मुख्यमंत्रीपदी कोणाला विराजमान करायचं, हा आता त्यांचा निर्णय आहे. मी माझा निर्णय यापूर्वीच स्पष्ट केला आहे. मी काळजीवाहू मुख्यमंत्री असल्यानं मला सर्वांची काळजी घ्यावी लागते.'' असंही शिंदे म्हणाले.



एकनाथ शिंदेंना हवे गृह खाते, तर अजित पवारांना अर्थ खाते : या बैठकीत खाते वाटपाबाबत सुद्धा चर्चा झाल्याची माहिती आहे. अडीच वर्षे मुख्यमंत्री पदावर राहिल्यानंतर एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री पदी विराजमान होण्यास तयार नाहीत. ते आपल्या पक्षातील इतर नेत्याला हे पद देऊ शकतात. यासोबत मुख्यमंत्री पद मिळत नसेल, तर किमान गृह आणि नगर विकास मंत्रालय तरी आमच्या पक्षाकडं द्यावं, अशी त्यांची मागणी आहे. अजित पवार यंदाही अर्थ खातं आपल्याकडं घेण्यासाठी आग्रही आहेत. परंतु गृह खात्यावर भाजपानं दावा केला. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना गृह खातं हे त्यांनी त्यांच्याकडंच ठेवलं होतं. आताही गृह खातं कुठल्याही परिस्थितीत ते सोडणार नाहीत, असे स्पष्ट संकेत असताना एकनाथ शिंदे गृहखात्यासाठी आग्रही आहेत.

## कोणत्याही फोटोवरून नेता नाराज आहे की नाही हा निकष कोणी काढू नये-उदय सामंत यांचे मत

**मुंबई/प्रतिनिधी :** कोणत्याही फोटोवरून नेता नाराज आहे की नाही हा निकष कोणी काढू नये,असे मत शिवसेनेचे उपनेते आमदार उदय सामंत यांनी माध्यमासमोर बोलताना व्यक्त केले. माध्यमांशी बोलताना उदय सामंत म्हणाले की,दिल्लीमध्ये अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली,त्यात एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार सुद्धा उपस्थित होते.अतिशय सन्मानपूर्वक ती बैठक पार पडली. आम्ही देखील आमच्या मागण्या अमित शाहांसमोर ठेवल्या. त्या मागण्यांचा सन्मान होईल याची मला पूर्ण खात्री आहे. एकनाथ शिंदेंना त्यांच्या ग्रामदेवतेचे दर्शन घ्यायचे होते, विश्रांती घ्यायची होती म्हणून ते गावी गेले ते काही देश सोडून गेले नाहीत, त्यांची अजिबात नाराजी नाही. तुम्ही जर फोटो बघून ठरवणार असाल तर मग आता फोटो काढताना कसे उभ रहायचे याचे ट्रेनिंग आम्हाला घ्यावे लागेल. कोणत्याही फोटो वरून नेता नाराज आहे की नाही हा निकष कोणी काढू नये, असे मत यावेळी शिवसेनेचे उपनेते आमदार उदय सामंत यांनी व्यक्त केले.

# मशीनवर आक्षेप नाही निवडणूक आयोगाच्या व्यवस्थापनावर आहे

## नाना पटोले यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री कोण बनेल ते त्यांच्या पक्षाचे नेते निर्णय घेतील, मुख्यमंत्री नाराज आहेत की, नाही याच्याशी आमचे काही देणे घेणे नसून माझा आक्षेप हा मशनवर नसून निवडणूक आयोग्याच्या व्यवस्थापनावर आहे. असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नागपूर येथे माध्यमांशी बोलताना केला. यावेळी ते म्हणाले की, माझा प्रश्न्न निवडणूक आयोगाला आहे, त्याचं त्यांनी उत्तर द्यावे, काल अनेक चॅनल्सनी डी बेट केले ८५-९० टक्के लोकांनी सांगितले नाना पटोले जे बोलत आहेत ते खरं आहे. हे काही आहे ती जनभावना आहे. एकट्या नाना पटोलेंची नाही, त्यामुळे याचे गांभीर्य सगळ्यांसह चौथ्य़ास्तभांनी देखील घेणे गरजेच आहे. मी मशीनवर काही बोलत नाहीये पण मत वाढली कशी याचे उत्तर निवडणूक आयोगाने द्यावे,६२.२ टक्के मतदान झाल्यावर रात्री ६६.५ टक्के मतदान झाल्याचे सांगतात,९ लाख मत वाढली याच उत्तर निवडणूक आयोगाने द्यावे,असा प्रश्न्नही यावेळी नाना पटोले यांनी केला. तसेच यावेळी त्यांनी सुप्रीम कोर्ट आणि निवडणूक आयोगाने पारदर्शकता दाखववावी, निवडणूक आयोगाच्या व्यवस्थापणा वरतीच आमचा आक्षेप आहे. ९ लाख ९९ हजार ५१३ जे मतदान झालय ते कुठून झालेलं आहे ?असा प्रश्न्न निर्माण होत आहे. कर्मचारी अधिकारी कोणाचे नसतात ते इकडून तिकडे जात असतात पण लोकशाही वाचली तर आपण वाचू असे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले. ११.५९ ला वोटिंग टक्के देऊन मतदान कस वाढवतात? ती मत कशी वाढली, याबाबत आमचे केंद्रीय नेतृत्व निवडणूक आयोगाला भेटणार आहे आणि ही लढाई न्यायालयीन पद्धतीने लढू आणि रस्त्यावरची पण लढाई लढू,असे म्हणाले तर बंटी शेळके यांच्याबाबत पत्रकारांनी प्रश्न्न केला असता त्यावर मी नंतर बोलले, तो संघटनेतला विषय आहे,असे बोलून प्रतिक्रिया देण्याचे टाळले. मी लोकशाही वाचवण्यासाठी काम करत आहे, हे गांभीर्याने घेण्याची गरज आहे, लोकशाही वाचेल तर देश वाचणार आहे. झारखंडात मते वाढली पण फक्त दीड टक्का वाढली होती, पण महाराष्ट्रमध्ये ७.६ टक्के मतदान वाढले, एवढी लाईन कुठे लागली? बूथ कॅपचरिंग निवडणूक आयोग करत आहे का? असा प्रश्न्न उपस्थित होत आहे.असे मत व्यक्त केले. तर हे लोकांचा मतांनी सरकार आले असते तर काळजी असती, हे



निवडणूक आयोगाचा कृपेने सरकार आले, त्यामुळे या सरकारला काही काळजी नाही, असा आरोपही केला. राज्यात अनेक प्रश्न्न आहेत, जनतेची भीती नसल्याने हे सरकार असे वागत आहे, माझी भूमिका निवडणूक आयोगाचा अप्रामाणिकपणावर आहे.असा आरोप करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज आहेत की नाही, याबाबत आम्हाला काही देणे घेणे नाही, असे मतही यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले.

## मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते. मराठी साहित्य विश्र्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली. १९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडियावर बंदी, सरकारच्या निर्णयाला 'मेटा'चा विरोध

मेलबर्न : ऑस्ट्रेलियन सिनेटनं गुरुवारी १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडियावर बंदी घालणारं विधेयक मंजूर केलंय. अशा प्रकारचा हा जगातील पहिलाच कायदा असेल. या कायद्यात अशी तरतूद आहे की जर 'टिकटॉक', 'फ`सबुक', 'स्नॅपचॅट', 'रेडडिट', 'एक्स' आणि 'इन्स्टाग्राम' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांचे खाते उघडण्याससोशल मिडियावर बंदी घालण्यात येणार आहे. तसंच असं एखाद्यानं केल्यास ५० दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्सपर्यत संबंधिताला दंड होऊ शकतो.


Australian Parliamente नं संमत केला कायदा : हे विधेयक सिनेटमध्ये १९ विरुद्ध ३४ मतांनी मंजूर झालं. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हनं याला आधीच १३ विरुद्ध १०२ मतांनी मंजूरी दिली आहे. तथापि, सिनेटमध्ये विरोधकांनी आणलेल्या दुरुस्त्यांना प्रतिनिधीगृहानं अद्याप मंजुरी दिलेली नाही. पण ती केवळ औपचारिकता आहे, कारण ती पास होणार असल्याचं सरकारनं आधीच मान्य केलं आहे. आता सोशल मीडिया प्लॅटफॉर्मकडं या बंदीची अंमलबजावणी कशी करावी हे ठरवण्यासाठी एक वर्ष लागणार आहे.

मेटानं केला कायद्याला विरोध : फेसबुक आणि इन्स्टाग्रामचं संचालन करणाऱ्या मेटा कंपनीनं या निर्णयाला विरोध केलाय. कंपनीनं याबाबत सांगितलं की, 'हा घाईगडबडीत केलेला कायदा आहे'. ''मुलांना सोशल मीडिया वापरण्यास बंदी घातल्यानं वापरकर्तयांच्या गोपनीयतेवर परिणाम होईल. कारण त्यांना त्यांचं वय १६ वर्षापेक्षा जास्त असल्याचं सिद्ध करावं लागेल'', असं कायद्याच्या समीक्षकांनी म्हटलं आहे. ऑनलाइन सेफ्टी कॅम्पेन चालवणाऱ्या सोन्या रायन यांनी सिनेटमधून हे विधेयक मंजूर होणे हा मुलांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचा क्षण असल्याचं म्हटलं आहे.



# हळव्या मनाचा आमदार पोहोचला भाजीमंडीत

## उच्चशिक्षित व जागतिक दर्जाच्या शहरात राहूनही साधेपणा कायम



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : गाव खेड्यात व सर्वसामान्य कुटुंबात बालपण गेल्याने संपूर्ण मनावर आपलेपणाचे संस्कार झाले. कर्तुत्वाने उच्च शिक्षण घेत मंत्रालय सहसचिव पदापर्यंत मजलही मारली आणि जागतिक दर्जाचे शहर असलेल्या मुंबई नगरीतही अनेक वर्ष वास्तव्य केले.असे असतानाही गाव खेड्यात आपलेपणाचे व साधेपणाचे झालेले संस्कार कायम ठेवत आमदार सिद्धार्थ खरात यांनी आपल्या पदाचा कधी बडेजाव पणा केला नाही, नुकतेच ते आमदारही झाले, मुंबानगरीत जाऊनही आले. मात्र शारगंधर बालाजीच्या मेहकर नगरीत येताच एक सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे भाजीमंडीत पोहोचले. हातात थैली अन् भाजीपाला खरेदी केला. हा प्रकार सर्वसामान्यांनी पाहताच ते थोडा वेळ अचंबित झाले आणि आमदार भाजीमंडई म्हणत सर्वांनी आमदाराला शुभेच्छा देण्यासाठी झुंबड केली. हा प्रकार दिसून आला मेहकर येथील भाजीमंडीत नवनिर्वाचित हळव्या मनाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या साधेपणाने.**

नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात हे मेहकर तालुक्यातील एका छोट्याशा खेड्यातील असल्याने त्यांनी भाजीमंडी शेतातील निंदन, पेरणी, डवरणी आदी कामे जवळून पाहिली आहेत. सर्वसामान्य कुटुंबात व गाव खेड्यात राहून त्यांनी आपल्या जिद्दीने उच्चशिक्षण घेत मुंबईत मंत्रालयात नोकरी मिळवली. उच्चशिक्षित आणि एका सर्वोच्च ठिकाणी व जागतिक दर्जाच्या शहरात नोकरीला असतानाही त्यांनी आपला साधेपणा नेहमीच कायम ठेवला. तर नोकरी करताना गावाशी व शेतीशी व आपल्या बालपणाच्या सवंगड्याशी नेहमीच नाळ कायम ठेवली. जिद्दीने उच्च शिक्षण उच्च नौकरी मिळवल्यानंतरही त्यांनी आपले जगणे हे सर्वसामान्यांसाठी कायम ठेवले. नोकरी संपल्यानंतर उर्वरित आयुष्य समाज हितासाठी खर्ची करण्याचा निर्णय घेत राजकारणात पाऊल टाकले आणि त्यांना पहिल्याच प्रयत्नात यश आले आणि आमदारही झाले. मुंबईत स्थायिक झाल्यानंतरही त्यांचे नेहमी मेहकरत येणे जाणे असायचे. आता तर ते मेहकर मतदारसंघाचे आमदार झाल्याने मेहकर शहरांमध्येच भाड्याने घेतलेल्या घरात स्थायिक झाले आहेत. त्या घराला त्यांनी 'यामिनी' नाव दिले आहे. नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात हे मुंबईहून मेहकर येथे पोहोचतात त्यांनी थेट भाजीमंडीत जात सर्वसामान्य व्यक्ती प्रमाणे मेथी, शेपूची भाजी व शेंगड्याच्या शेंगा खरेदी केल्या. भाजी विक्रेत्यांच्या समस्या जाणून घेतल्या, एकूण बाजाराची माहिती घेतली. यावेळी काही लोकांच्या लक्षात आले की, आमदार भाजी खरेदीसाठी आले आहे.. मग तिथेच अभिनंदनासाठी एकच झुंबड केली.तर आमदार झाल्यानंतरही सर्वसामान्यातील माणूस जमिनीवर राहू शकतो, याची प्रचिती यानिमित्ताने आली.

### अन् भाजीपाला विक्रेत्यांच्या समस्या जाणून घेतल्या


राजकीय क्षेत्र हे समाजसेवा करण्याचे एक प्रभावी क्षेत्र आहे. राजकीय क्षेत्रातून गोरगरीब सर्वसामान्यांच सेवा करण्याची मिळालेल्या संधीचे सोने करीत आमदार सिद्धार्थ खरात यांनी आमदार होताच थेट भाजीपाला बाजी मंडीत पोहोचत एक सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे भाजीची खरेदी केली. तेथील बाजी बाला विक्रेत्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या समस्या सोडवण्यासाठी काय करता येईल याबाबत भाजी मंडीतील नागरिकांशी संवादही साधला. सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे आमदार भाजीपाला खरेदी करताना नागरिकांनी दिसताच त्यांनी अभिनंदन करण्यासाठी एकच झुंबड केली.तर आमदाराने ही एक सर्वसामान्यांमध्ये मिसळून एक आपल्या हळव्या मनाचे व सर्वसामान्य अन्य पणाचे नागरिकांचे मने जिंकून घेतले.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

# पुस्तके वाचणारी मुले

पुस्तक वाचून काय होते ? पुस्तक का वाचावे? याचे उत्तर तुम्हाला स्वतःच शोधावे लागेल तरच तुम्हाला पुस्तकांचे महत्व कळेल. बरं अशी कधी ऐकल आहे का की एखांद्या कवीने, लेखकांनी कुणाचा खून केलाकुणाची हत्या केली.. मोठ्या प्रमाणत जाळपोळ केली..असंख्य लोकांना मारून त्यांच्यावर राज्य केले.. ते स्वतः आत्महत्या करतील पण दुसऱ्याना सहसा त्रास देणार नाहीत.. त्यांना दुसऱ्यांच्या भावनांची कदर असतेतुम्ही वर्तमान पत्र वाचा. उच्च शिक्षित लोकांनी आई – वडिलांचा , सासू – सासऱ्याचा छळ केला.. त्यांना मारले.. उच्च शिक्षित लोक दहशतवादी झालेतका होतात हे लोक? उच्च शिक्षित अस्या विद्यापीठात देखील मोठ्या प्रमाणात गलीच्च राजकारण.. राजकारणासाठी लोकांची हत्या होते.



हिटलर का हिटलर झाला.. लहानपणी त्याने कसे दिवस काढले..? शोधा, वाचाम्हणजे उत्तर सापडेल वाचन का आवश्यक आहे ?

पुस्तके वाचणारी मुले हा लेख लिहण्याचा उद्देश हा की मुलांनी विद्यार्थ्यांनी अधिक अधिक पुस्तकांचे वाचन करावे. आजच्या विद्यार्थ्यां जवळ असणारे ज्ञान ही त्यांची फार मोठी शक्ती आहे .या शक्तीच्या सहाय्याने तो सुबुद्ध आणि प्रगल्भ तर होतोच परंतु त्याचा कार्यशक्ती देखील प्रभाव पडतो. पुस्तकाचे वाचन जेवढे कराल तेवढे ज्ञान वाढत जाईल. वाचन हे ज्ञान मिळवण्याचे साधन आहे.वाचनाने जीवन समृद्ध होते. कोणत्याही क्षेत्रात तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर तुम्हाला सतत त्या क्षेत्रातील नवेनवे ज्ञान,नवी नवी माहिती आणि अद्यावत कौशल्ये आत्मसात करावी लागतील. त्यासाठी पुस्तकांचे वाचन करावेच लागते. त्यामुळे शालेय ग्रंथालयाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी अधिक अधिक पुस्तकांचे वाचन करावे.

आपल्या शाळेच्या ग्रंथालयात असंख्य मुले आवडीने पुस्तके वाचतात.. मुले दररोज पुस्तके घरी घेऊन जातात आणि मोठ्या आवडीने वाचतात.. दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रेमानी सांगतात की सर हे पुस्तक वाचवण्यासाठी मला खूप आवडले. त्या पुस्तकांबद्दल माहिती सांगतातआणि म्हणतात की सर माझ्या आवडीचे पुस्तके आपल्या ग्रंथालयात आवर्जून आणा.. माझ्यासाठी पुस्तके राखून ठेवाकाही मुले न चुकता ग्रंथालयात येतात आणि आपल्या आवडीची पुस्तके घेऊन जातातकाही मुले सांगतात की सर आम्ही आमच्या आई –बाबासोबत पुस्तके वाचत असतो.. माझी आई –बाबा सांगतात की हे पुस्तक वाचा.. ग्रंथालयातून हे हे पुस्तक आणाआपल्या शाळेतील मुले पुस्तकांवर खूप प्रेम करणारी आहेत. त्यांना पुस्तके वाचायला आवडतात. पुस्तकातील महत्वपूर्ण माहिती लिहून काढतात.. काही मुलांनी १०० कथा कविता लिहल्या आहे. काही मुलांनी स्वतःची पुस्तके लिहली आहेत. आपल्या शाळेच्या ग्रंथालयाबद्दल थोडक्यात माहिती जाणून घेऊयात.

पोदार शाळेत उत्तम ग्रंथालय सेवा देणारे एक मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन करण्यात आले आहे. सुसज्ञ आणि ग्रंथसंपन्न असे ग्रंथालय शालेय बालवाचकांना आपल्या ग्रंथालयीनसेवा – सुविधा देण्यात आघाडीवर असते. ग्रंथालय हे शाळेचे हृदय असते. ते शाळेच्या वैभव आणि सोंदर्यात अधिक भर टाकत असते. संस्थेच्या शैक्षणिक उद्देशपूर्तीसाठी आपले वाचनविषयक कार्य करून संस्थेच्या उज्वल यशात मोलाचा सहभाग देत असते.

आजच्या बदलत्या डिजिटलायझेशनच्या काळात ग्रंथालयानेही डिजिटल क्लासरूमची आणि डिजिडल लायब्ररीची उभारणी केली आहे. हायस्पीड इंटरनेटची जोडणी असणारे डिजिटल लायब्ररी आहे. व्हिडिओ ऑडिओ यांच्या द्वारे विद्यार्थ्यांना या डिजिटल लायब्ररीच्या माध्यमातून अत्याधुनिक पद्धतीने ज्ञानस्रोत उपलब्ध करून देण्यात येतात. लायब्ररीच्या वर्गात कोणत्याही विषयावर सचित्र माहिती उपलब्ध होत असल्याने विद्यार्थीनींना विषय समजून घेणे सोपे जाते. आजच्या बदलत्या युगात स्मार्ट लायब्ररी स्थापन करून शाळेच्या स्मार्ट विद्यार्थ्यांना विविध विषयावरील ज्ञान ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

समृद्ध आणि संपन्न अश्या ग्रंथसंपदेत रामायणकथा, महाभारत कथासंग्रह, निती कथा संग्रह, जातक कथा संग्रह, परीच्या छान –छान गोष्टी, पंचतंत्र कथा, तेनालीराम कथा, अकबर –बिरबल बोधकथा, अरबीयन नाईट बालकथा, हैरी पॉटर स्टोरी बुक्स, गणित विकीपीडिया, सायन्स विकीपीडिया, भूगोल विकीपीडिया, इंग्रजी शब्दकोश यासह विविध विषयावरील प्रसिद्ध असे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, मिसाईल मॅन डॉ. अब्दुल कलाम, इंदिरा गांधी आणि मदर टेरेसा यासारख्या असंख्य भारतीय महान महापुरुषांचे चरित्रात्मक पुस्तके उपलब्ध आहेत. महान क्रांतिकारक शहीद भगत सिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस आणि मंगल पांडे यासह भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचे चरित्रात्मक ग्रंथ उपलब्ध आहेत. राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैज्ञानिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विचारवंताचे चरित्रात्मक समृद्ध ग्रंथ उपलब्ध आहेत.

बालवाचकांना वर्तमानपत्र वाचनाची सवय लागावी. मुलांनी दररोज वर्तमानपत्र वाचावे.जगातील दैनंदिन चालुघडामोडीचे आणि सामान्य ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी मुलांना वर्तमानपत्र वाचण्याचे महत्व आणि फायदे सांगून वर्तमानपत्र वाचण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते.

शाळेच्या ग्रंथालयात विवीध वर्तमानपत्र वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. जग, भारत, महाराष्ट्र, भारतातील राज्य याचे विविध विषयावरील माहितीपूर्ण नकाशे उपलब्ध करून देण्यात येतात.

शिक्षण मानवी आणि आर्थिक विकासाची एक महत्वाची गुंतवणूक आहे. शाळेमध्ये मध्ये ग्रंथालय स्थापन करून विद्यार्थ्यांना बौद्धीक विकासासाठी ग्रंथालयाच्या माध्यमातून सतत प्रयत्न केले जातात.बालवाचकांना विविध विषयावरील समृद्ध ग्रंथ वाचण्यासाठी दिले जातात. वाचलेल्या पुस्तकांबद्दल माहिती विचारण्यात येते. बालवाचकांनी वाचलेल्या पुस्तकांवर सारांशत्मक माहिती लिहण्यास सांगण्यात येते. मुले ती माहिती एका पेजवर लिहून ग्रंथालयाकडे जमा करतात. ग्रंथालयाच्या माध्यमातून बालवाचकांनी लिहलेल्या सारांश शाळेच्या सॉफ्टबोर्ड आणि शाळेच्या ब्लॉगवर प्रसिद्ध करण्यात येता असतो.

विद्यार्थ्यांना ग्रंथालय तास, रिकाम्या वेळेत, मधल्या सुट्टीत ग्रंथालयाचा वापर करण्याची संधी देण्यात येते. त्यामुळे ग्रंथालयात विद्यार्थ्यांना ग्रंथ हाताळण्याची, ग्रंथाच्या सहवासात राहण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांच्या मनात ग्रंथाबाबत आपुलकी निर्माण होते. ग्रंथाशी त्याचे मित्रत्वाचे नाते तयार होण्यास मदत होते. त्यातूनच विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचनाची आवड निर्माण होते. शालेय ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना आपल्या आवडीची ग्रंथ घरी वाचण्यासाठी देण्यात येतात. शालेय विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी आणि वाचन आवड वृद्धिंगत करण्यासाठी शालेय ग्रंथालयातून ग्रंथ देव –घेव करण्यात येते. हे एक महत्वपूर्ण असे शैक्षणिक कार्य आहे.शालेय ग्रंथालयाच्या माध्यमातून बालवाचक आणि शिक्षकांना ग्रंथालयीन संदर्भसेवा देण्यात येते.

पुस्तक प्रदर्शन आणि विक्री, वाचन प्रेरणा दिवस, ग्रंथदिवस, ग्रंथपाल दिवस यासह सामान्य ज्ञान, कविता, बोधकथा, पुस्तक वाचन आणि वाचलेल्या पुस्तकांवर सारांश लेखन यासारखे उपक्रम ग्रंथालया द्वारे घेण्यात येतात. आजच्या कोरोना काळातही डिजिटल लायब्ररी सुरु करून विद्यार्थ्यांसाठी हजारो ई – पुस्तके ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथातून आपले राष्ट्र , राष्ट्रीय मूल्ये, संस्कृती, विचारधारा आणि जीवन प्रणाली यांचे दर्शन घडते. राष्ट्रीय संस्कृती, सामाजिक मूल्य आणि राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी ग्रंथ वाचन करणे आवश्यक आहे.

महा वाचन उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून जवळ जवळ ९०० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला आहे.

बालवाचक घडवावे

आजच्या गतिमान जीवनशैलीत मुलांमध्ये वाचनाविषयीची आणि साहित्याची गोडी निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शालेय ग्रंथालय आणि पालकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. शाळेच्या दैनंदिन परिपाठमध्ये शिक्षकांनी मुलांना एक कविता, एक कथा, पुस्तकातील काही भाग किंवा महापुरुषचे जीवनचरित्र वाचून दाखवायाला सांगावे. शाळेतील शिक्षकांनी देखील मुलांना वाचन करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

वाचन आणि व्यक्तीमत्व विकास

शाळा हे वाचन संस्कृती विकसित करणारे केंद्रे आहेत. येथे वाचनाचे धडे देण्यात येतात.शालेय ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक अधिक पुस्तके वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. ग्रंथ वाचनाच्या माध्यमातून महान व्यक्तीमत्व घडणाऱ्या आणि मानवाला जागृत करणाऱ्या महानुभवांची उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यासारखे महामानव अखंड ग्रंथ वाचन करत असत. स्वामी विवेकानंद हे वाचनाचे फार मोठे भोक्ते होते. ते ग्रंथालयातून रोज एक पुस्तक आणून वाचत असत आणि दुसऱ्या दिवशी ते पुस्तक वापस करून नवीन पुस्तक वाचण्यासाठी आणत असत.

वाचायचे कशाला ?

वाचनाची विद्यार्थ्यांच्या विकासात महत्वाची भूमिका असते. वाचनाचा मनावर विचारावर परिणाम घडत असतो आणि पर्यायाने त्याचे कृतीमध्ये रूपांतर होऊन विद्यार्थी संस्कारशील बनतात. वाचन विद्यार्थ्यांच्या मनाचे टॉनिक आहे. ते त्यांच्या मनाला कार्यप्रवृत करते. वाचन हे जीवनाला आकार देत असते. वाचन मनाला प्रोत्साहन देते. नव – नवीन कल्पना देते. शहाणपण देते. सदाचारी वागण्याचे बळ देते. संकटातही खचून न जाता संघर्ष करण्याचे साहस ग्रंथ देतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम होत. डॉ. कलाम म्हणतात,'ग्रंथ सदैव माझे मित्र आहेत. गेल्या पन्नास वर्षाहून काळ ग्रंथांनी मला स्वप्न दिली. स्वप्नांमधून जीवितध्येय गवसली. ग्रंथांनी मला ध्येयपूर्तीसाठी आत्मविश्र्वासाने सज्ञ होण्यास साहाय्य केले. अपयशाच्या प्रसंगी ग्रंथानीच मला ध्येर्य दिले. उत्तम ग्रंथ माझ्या लेखी ते देवदूत होते. एरवीही ते माझ्या काळजाला हळुवार स्पर्श करतात. म्हणूनच मी माझ्या तरुण मित्रांना सांगतो. ग्रंथांशी मैत्री जोडा. ग्रंथ तुमचे उत्तम मित्र असतात.' म्हणूनच म्हटले जाते की ग्रंथ हे आपले सदैव मित्र, गुरु आणि मार्गदर्शक असतात. ग्रंथातुनच आपल्याला जीवनातील प्रकाशवाटा दिसतात. ग्रंथ वाचनातून मन स्वतंत्र विचार करायला प्रवृत्त बनते. ताण –तणावापासून सुटका होते. ग्रंथ वाचनाने विचार आणि स्मरणशक्ती सुधारण्यास मदत होऊ शकते. वाचनाने मनुष्य सर्वगुणसंपन्न बनतो म्हणून शालेय विद्यार्थ्यांनी दररोज किमान एक तास तरी ग्रंथ वाचन केले पाहिजे.

बालवाचक घडवण्यासाठी

शालेय ग्रंथालयासह पालकांनी मुलांना वाचन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यासाठी पालकांनी मुलांसोबत बसून पुस्तक वाचन करावे. मुलांना त्याच्या आवडीची पुस्तके खरेदी करून द्यावी आणि त्यांना वाचण्यासाठी सांगावे. मुलांनी वाचलेल्या पुस्तकांविषयी माहिती विचारावी. मुलांना कथा, कविता आणि अन्य वाचनीय साहित्याबद्दल माहिती द्यावी व ते वाचन करण्यासाठी प्रोत्साहित करावे. मुलांनी वाचलेल्या कथा आणि कविता सर्वांसमोर बोलण्यासाठी सांगावे म्हणजे मुलांना वाचण्याची अधिक गोडी निर्माण होईल. आजच्या अत्याधुनिक काळात बालकांना ग्रंथवाचनाची प्रेरणा देण्याची खरी गरज आहे. त्यासाठी शाळेच्या ग्रंथालय, शिक्षक यांच्यासह पालकांनी बालवाचक घडवण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ईव्हीएम विना निवडणुका घेऊन बघा तुमची ताकद कळेल : इम्तियाज जलील यांचा महायुतीला इशारा

दैनिक आपला विदर्भ


**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : ईव्हीएमविना निवडणुका घेऊन बघा तुमची ताकद कळेल, असा इशाराच इम्तियाज जलील यांनी महायुतीला दिला. ते छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, मी पूर्व मतदार संघाचे भाजपचे उमेदवार अतुल सावे यांनी पैसे वाटप केल्याचा आरोप केला होता. त्यावरती तिघांची कमिटी तयार करण्यात आली होती. तिघांनी रिपोर्ट तयार केले आहेत. त्यांचा रिपोर्ट आम्हाला मिळालेला नाही. तो रिपोर्ट बघून प्रशासनाने पुढची पाच तारीख दिली आहे.त्यांचे रिपोर्ट आणि माझ्या आरोप हे विरोधी पक्षाला दिले आहेत. हा निकाल लवकरात लवकर लागला पाहिजे. माझी इच्छा आहे की रोज त्यांनी सुनावणी घेतली तर तीन-चार दिवसात निकाल मिळेल.मी लेखी देण्याची गरज नाही मी दिलेले पुरावे हे पूर्णपणे व्हिडिओ आहेत.पैशाचा वापर कसा वापर झाला.मतदान बाद करण्याची काय काय केले हे सगळे त्यामध्ये आहे. यामुळे प्रशासनाने कोणत्याही बाजुने निकाल द्यावा, मात्र निकाल लवकर द्यावा.अश अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ईव्हीएमवर खूप प्रेम आहे. लोकांना ईव्हीएम नको आहे, तर तुम्ही त्यांच्यावर बळजबरी का करता.लोकांना ईव्हीएम नको आहे.फक्त तुमच्या फायद्यासाठी तुम्ही ईव्हीएम वापरता ते ईव्हीएम फेकून द्या.पूर्वी अनेक वर्ष बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या. लोकांचा विश्र्वास ईव्हीएमवर नाही आहे. विधाऊट ईव्हीएम शिवाय निवडणुका घेऊन बघा तुमची ताकद कळेल. असा इशाराच इम्तियाज जलील यांनी दिला. या निवडणुकीत ज्या पद्धतीचे निकाल आले आहेत. त्यावरून तुम्हाला कळेल की अनेक मतदारसंघात संशयास्पद निकाल आला आहे. ज्या गावात तिनशे लोकांचा मतदान आले, त्या ठिकाणी ६०० चा मतमोजणी झाली.एका ठिकाणी कुटुंबातली देखील उमेदवाराला मत मिळाले नाही. लोकांना ईव्हीएम नको आहे. कोर्टाचा इंटरेस्ट ईव्हीएमवर का आहे हे त्यांनी सांगावे. लोकशाहीमध्ये लोकांना जे पाहिजे ते दिले पाहिजे. ईव्हीएमची शिकार आम्ही देखील झालो आहोत. मी त्याच्या विरोधात आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर केला स्वतः त्यांनी पैसे घेऊन आले होते. मुख्यमंत्र्यांना मी चॅलेंज करतो ते कोणत्या हॉटेलमध्ये पैसे आले होते, मी सांगू शकतो. मुख्यमंत्र्यांनी हेलिकॉप्टर मध्ये पैसे आणले. पोलिसांच्या माध्यमातून ते गावागावात पोहोचवले. कुठेतरी तुमची चूक असेल म्हणून तुम्ही गप्प असेल. मुख्यमंत्री वाळूज मधले एका हॉटेलमध्ये कसे थांबले होते. तिथे पैसे कसे वाटले हे मला माहित आहे. हे



सीसीटीव्हीतून दिसून येईल. सरकारची मुदत संपली असली तरी सरकार आता दोन दिवस काय दोन वर्षे देखील सरकार शिवाय राज्य चालू शकते.अशी उपरोधिक टिकाही त्यांनी यावेळी केली. लोकशाही हळूहळू संपत चालली आहे. देशात आता हुकूमशाहीच्या वाटेने जात आहोत. या देशासाठी सर्वात घातक जगातला सगळ्यात मोठा लोकशाही भारतात आहे. या लोकशाहीत सर्वात बोगस सिस्टम असेल तर एलेक्ट्रोल सिस्टम आहे.हे भाजप आणि मोदी साठी मोदीसाठी काम करणारे लोक आहेत. एवढा उघडपणे आम्ही व्हिडिओचे पुरावे देत आहे. एका वकिलाच्या ऑफिसमध्ये मुस्लिम लोकांना दीड हजार रुपये देऊन इन्क लावून दिली जात होती. दलित वस्तीत कशा पैशांचा वापर झाला हे आम्ही दाखवले आहे. यासाठी कसली चौकशी करता? असा प्रश्र्नही यावेळी इम्तियाज जलील यांनी केला. जिल्हाधिकारी कोणत्या आधारावर म्हणतात की असं काही झाले नाही. ज्या जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या खुर्चीवर बसविले ते सरकारच्या विरोधात बोलणार नाही. मी जिल्हाधिकाऱ्यांना चॅलेंज करतो. आंबेडकर नगर मध्ये पैशांचे वाटप केले जात होते, त्याच्याकडे तुम्ही दुर्लक्ष का केलं?असा प्रश्र्नही यावेळी इम्तियाज जलील यांनी माध्यमांशी बोलताना केला.

## महत्त्वाचे...

### फळांचा राजा आंबा सांगलीच्या बाजारपेठेत दाखल





दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी** : सांगलीच्या बाजारात फळांचा राजा आंबा दाखल झाला आहे. हंगामापूर्वीच सांगलीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये देवगडचा आंबा हा पोहोचला आहे. पहिल्याच आंब्याच्या सौदयात कुणकेश्र्वर इथल्या शेतकऱ्याच्या हापूस आंब्याला तब्बल अडीच हजार रुपये इतका डझनाच्या पेटीला दर मिळाला आहे.सध्या २ पेट्यांची आवक झाली असून बाजार समितीच्या मुसा बागवान फ्रुट कंपनीच्या दुकानात पहिल्या दिवशी पार पडलेल्या आंबा सौद्यात चांगला दर मिळाला आहे.

### शेतकरी ओळख क्रमांकासाठी संकेतस्थळाची निर्मिती

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** भारत सरकारची ग्रीस्टॅक संकल्पना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संकल्पनेनुसार शेतकऱ्यासाठी तीन पायाभूत माहिति संच तयार करण्यात येणार आहेत. शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी या संकेतस्थळाचा णठङ ु.ाहषी.रसीळींरलज्ञ. सीं.ळप याचा वापर करता येईल. या संकेतस्थळावर करावयाच्या कार्यवाहीचे सादरीकरण दिले आहे. त्यानुसार या संकेतस्थळाचा वापर करुन नागरिकांनी स्वत:चा शेतकरी ओळख क्रमांक करावा. तसेच शेतकरी ओळख निर्माण करण्याची कार्यवाही मोठया प्रमाणात होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणानी प्रचार व प्रसार करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताची आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच, भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच या बाबीचा समावेश यामध्ये असणार आहे. शेतकऱ्यांचा माहिती संच निर्माण करण्यासाठी मोहीम स्वरुपात शेतकरी माहिती संच निर्माण करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत भारत सरकारच्या मदतीने महाराष्ट्र राज्याचा शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी स्वयं नोंदणी संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. या संकेतस्थळाद्वारे शेतकऱ्यांना स्वत:चा शेतकरी ओळख क्रमांक निर्माण करता येईल व शेतकरी माहिती संचात समाविष्ट करता येणार आहे.

### अनु. जाती व जमातीच्या शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर ३० नोव्हेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत विशेष मेळाव्याचे आयोजन

**नांदेड/प्रतिनिधी :** कृषि विभागामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत अनु. जाती व अनु. जमाती संवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर ३० नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या ठिंबक व तुषार सिंचनाबाबत तालुकास्तरावर, मंडळस्तरावर व तसेच गावोगावी माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यास अनु. जाती व अनु. जमाती संवर्गातील शेतकऱ्यांसाठी लक्षांक उपलब्ध असून लक्षांकापेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले आहे. तरी जिल्ह्यातील अनु. जाती व अनु. जमातीच्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व अधिकच्या माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

### जागतिक एड्स दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत जागतिक एड्स दिनाचा राज्यस्तरीय कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे ०२ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये एचआयव्ही/एड्स जनजागृतीपर आधारित प्रदर्शन स्टॉल, लोककलापथक सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींचे मनोगत तसेच जिल्हास्तरावर काम करणाऱ्या जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक यांचा सत्कार इ. कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. जागतिक एड्स दिन दरवर्षी ०१ डिसेंबर रोजी पाळला जातो. हा दिवस एड्सबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि एड्समुळे मृत पावलेल्यांना आदरांजली वाहण्यासाठी समर्पित आहे. यावर्षी सन २०२४ ची जागतिक एड्स दिनाची संकल्पना टेक द राईटस् पाथ ही आहे. ही संकल्पना एचआयव्ही/एड्स संसर्गाचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी तसेच मानवी हक्कांचे समर्थन करण्याच्या महत्वावर भर देते. या कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव-२ नवीन सोना, आरोग्य सेवा आयुक्त थी. ओमागाधू श्री. रंगा नाईक, संचालक आरोग्य सेवा, मुंबई डॉ. स्वप्निल लाळे, संचालक आरोग्य सेवा, पुणे डॉ. नितीन अंबाडेकर, अतिरिक्त प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था डॉ. विजय कंदेवाड, सिनेकलाकार संजय नार्वेकर, श्रीमती कल्याणी मुळे उपस्थित राहणार आहेत.

# अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या घरावर ईडीचा छापा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी हीच्या सांताक्रुझ येतील घरावर ईडीने छापा टाकला आहे. पोर्नोग्राफी केससंर्भात मुंबई आणि उत्तर प्रदेशात १५ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. यामध्ये शिल्पा शेट्टीच्याही घरी ईडीने ही कारवाई केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्र यांच्याशी निगडीत असलेल्या काही खटल्यांप्रकरणी ही कारवाई केली आहे.

अडल्ट कन्टेंट निर्मिती आणि अशा प्रकारच्या कन्टेंन्टचे मोबाईलच्या ॲपच्या माध्यमातून वितरण केल्याचा राज कुंद्रा यांच्यावर आरोप आहे. याच खटल्यासंदर्भात त्यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचाही आरोप त्यांच्यावर आहे. याच आरोपांखाली राज कुंद्रा काही दिवस तुरुंगात होते. आता ते या खटल्यात जामिनावर बाहेर आहेत.

ईडीकडून एकूण १५ ठिकाणी छापेमारी

अडल्ट कन्टेन्ट तयार करण्याबाबतच्या आरोपत राज कुंद्रा यांच्या कंपनीचे नाव आले होते. याच प्रकरणाचा तपास करण्यासाठी ईडीने आज उत्तर प्रदेश आणि मुंबईत एकूण १५ ठिकाणी छापेमारी केली आहे. यात शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या घराचाही सहभाग आहे. या छापेमारीत ईडीकडून सर्च ऑपरेशन राबवले जात आहे.

९७ कोटींची मालमत्ता केली होती जप्त

२०२१ साली राज कुंद्रा यांच्यावर वरील आरोप करण्यात आले होते. याच प्रकरणासंदर्भात कारवाई म्हणून एप्रिल २०२४ मध्ये ईडीने राज कुंद्रा यांची ९७ कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली होती. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा म्हणजेच इश्थ्अ, २००२ अंतर्गत राज कुंद्रा यांच्यावर सध्या खटला चालू आहे.

२०१८ सालीही राज कुंद्रा वादात

राज कुंद्रा हे २०१८ सालीदेखील वादात सापडले होते. सक्तवसुली संचालनालयाने राज कुंद्र यांची २०१८ साली २००० कोटी रुपयांच्या बिटकॉईन घोटाळ्याबाबत चौकशी केली होती. दरम्यान, ईडीने केलेल्या या कारवाईमुळे राज कुंद्रा तसेच शिल्पा शेट्टीच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात नेमके काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# तुळजाभवानी मंदिराचं रुप पालटणार! १०८ फुटी नवं महाद्वार बांधलं जाणार

दैनिक आपला विदर्भ

**तुळजापूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. नवसाला पावणाऱ्या तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते. अशातच तुळजापूर देवी मंदिर समितीने देवी तिर्थक्षेत्राचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंदिर समितीच्या स्वनिधीतून ५८ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये तुळजाभवानी मंदिराचं मुख्य प्रवेशद्वार असलेल्या राजमाता जिजाऊ आणि राजे शहाजी महाद्वाराचा समावेश आहे.

सध्या यासाठीचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे.

तुळजाभवानी मंदिराच्या दोन्ही म हाद्वाराचं स्ट्रक्चरल ऑडिट होणार आहे.



ऑडिट रिपोर्ट नकारात्मक आला तर दोन्ही महाद्वार पाडून १०८ फुटी नवं महाद्वार बांधलं जाणार आहे. तर ऑडिट रिपोर्ट सकारात्मक आला तर दोन्ही महाद्वारांच्या मध्ये नवीन महाद्वार तयार बांधले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी दिली.

भाविकांची विशेष काळजी

पुरातत्व खात्याच्या निगराणीखाली कुलस्वामिनी तुळजाभवानी मंदिराच्या सभामंडपचा काही भाग पूर्ण पाडून पुन्हा नव्याने मजबूत केला जाणार आहे. तसेच मंदिरासह आजूबाजूचा भागही मोकळा करून घेतला जाणार आहे. दरम्यान याकाळात भाविक, पुजारी बांधव आणि व्यापारी वर्गाला त्याचा त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे

पुढील काळात लिफ्ट आणि रॅम्प उभारणार

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येर्णाया ज्येष्ठ आणि दिव्यांग भाविकांच्या सुविधेसाठी पुढील काळात लिफ्ट आणि रॅम्पची व्यवस्थाही केली जाणार आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनानंतर प्रत्येक भक्त हा अत्यंत उत्साहात आणि समाधानाने आपल्या घरी जावा, असेही नियोजन करण्यात येत आहे.

# महायुतीच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदेंच्या फोटोची चर्चा, बहुमतानं बिघडलं राजकीय गणित?

**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याबरोबर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे गटनेते अजित पवार आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची गुरुवारी बैठक झाली. या बैठकीनंतर महायुतीचे नेते आणि भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या एकत्रित फोटो हे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याबरोबर महायुतीच्या नेत्यांची गुरुवारी रात्री बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्रिपद आणि नवे सरकार स्थापन करण्याबाबत चर्चा झाली. भाजपाकडून मुख्यमंत्रिपदाचा घेण्यात येणाऱ्या निर्णयाला शिवसेनेचा पाठिंबा असेल, असे यापूर्वी शिंदे यांनी जाहीर केले. मात्र, दिल्लीती बैठकीनंतरही महायुतीकडून मुख्यमंत्रिपदाचा निर्णय जाहीर झालेला नाही. बैठकीनंतर अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांचे हसरे चेहरे फोटोतून दिसून आले. दुसरीकडं एकनाथ शिंदे हे नाराज असल्याचं देहबोलीतून दिसत होते.

एकनाथ शिंदे यांच्या एक्स मीडियावरून महायुतीच्या बैठकीबाबत मौन- देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या एक्स मीडियावरून बैठकीचे फोटो पोस्ट करण्यात आले. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या एक्स मीडिया अकाउंटवर महायुतीच्या बैठकीबाबत कोणतीही पोस्ट करण्यात आली नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटले, '' विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरून या महत्वाच्या लढाईमध्ये जी साथ मा. केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शाह जी यांनी दिली आणि सर्व कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण केली, प्रेरणा दिली याबद्दल त्यांचे आज नवी दिल्ली येथे मन:पूर्वक आभार मानले ! यावेळी भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष मा. जेपी नड्डा जी, एकनाथ शिंदे जी, अजित दादा पवार आणि महायुतीचे वरिष्ठ नेते, सहकारी उपस्थित होते.'' अजित पवार यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटले, '' देशाचे गृहमंत्री आणि भाजपचे राष्ट्रीय नेते मा. श्री. अमितभाई शाह यांची त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी भेट घेऊन महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत म हायुतीच्या घवघवीत यशाबद्दल अभिनंदन केले''.

एकट्या भाजपाकडं आहे बहुमत?- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपाचे १३२ उमेदवार निवडून आल्यानं भाजपा हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळं एकटा भाजपा बहुमताच्या अगदी जवळ आहे. भाजपानं मित्रपक्षांना दिलेले ९ उमेदवारही विधानसभा निवडणुकीत विजयी झाले आहेत. त्याचबरोबर पाच अपक्ष आमदारांनी भाजपाला पाठिंबा दिला. त्यामुळे भाजपाचं एकूण संख्याबळ १४६ असल्यानं भाजपा स्वबळावर सरकार स्थापन करू शकेल, अशी स्थिती आहे. अशा राजकीय परिस्थितीत राष्ट्रवादी आणि शिवसेनेला जास्तीत जास्त मंत्रिपदासाठी आणि ठराविक खात्यांसाठी फारसा आग्रह धरता येणार नाही, असे राजकीय विषकांचं मत आहे.

# वक्फ बोर्डाला तातडीने १० कोटींचा निधी मंजूर, अल्पसंख्याक विभागाचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : वक्फ बोर्डाला पायाभूत सुविधांसाठी तसंच बळकटीकरणासाठी १० कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणुकांपुर्वी राज्य सरकारने हा निर्णय घेतला होता. मात्र, काल २८ नोव्हेंबर रोजी जीआर काढण्यात आला आहे. राज्य सरकारने राज्य वक्फ बोर्डाला वेगवेगळ्या पायाभूत सुविधांसाठी १० कोटी रुपये निधी जाहीर केला आहे. अल्पसंख्यांक विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.

शासन निर्णयामध्ये दिलेल्या माहितीनुसार २०२४-२५ वर्षात अर्थसंकल्पीय अंदाज आणि पुरवणी म ागणीद्वारे एकूण २० कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामधून २ कोटी अनुदान वक्फ बोर्डाला वितरित करण्यात आले आहे. तर आता १० कोटी रुपये अदा करण्यात येणार आहेत. वक्फ बोर्डाच्या बळकटीकरणासाठी हा निधी देण्यात येणार आहे.

वित्त विभागाचं शासन परिपत्रक क्रम ांक अर्थसं-२०२४प्रक्र.३४अर्थ-३,१ एप्रिल २०२४ आणि शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०२४प्रक्र.८०अर्थ-३ ,२५ जुलै २०२४ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना १० कोटी रुपये अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून आहरित करण्यास तसेच कोषागारात देयक सादर करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे, असं शासन निर्णयात म्हटलं आहे.

भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी एक्सवर पोस्ट करुन भूमिका मांडली आहे. ते म्हणाले वक्फ बोर्डाला निधी दिल्याची बातमी सध्या सुरू आहे. सध्या महाराष्ट्रात काळजीवाहू सरकार आहे व या सरकारला धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नसतो. फक्त तातडीने काही आपत्कालीन निर्णय करावे लागले तरच करता येतात. निधी बाबतचा निर्णय प्रशासकीय पातळीवरून घेतला गेला असे दिसते त्यामुळं प्रशासन आपल्या निर्णयात दुरुस्ती करेल अशी आशा आहे, असं केशव उपाध्ये म्हणाले.

वक्फ कायदा दुरुस्ती विधयेकावर सर्वसंमती बनवण्यासठी जेपीसी स्थापन केली होती. त्या जेपीसीला अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जेपीसीमधील विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जेपीसीच्या अध्यक्षांच्या ड्राफ्ट रिपोर्ट सादर करण्याच्या निर्णयाचा विरोध करत बैठकीवर बहिष्कार टाकला होता. जेपीसीला मुदतवाढ देण्याची मागणी देखील करण्यात आली होती. त्यानुसार गुरुवारी जेपीसीला मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळं आता अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत जेपीसीला काम करता येईल. कॉंग्रेसच्या खासदारांनी जेपीसी अध्यक्षा जगदंबिका पाल यांना कुणीतरी सूचना देत असल्याचं म्हटलं होतं. कॉंग्रेस खासदार गौदरव गोगोई यांनी म्हटलं की ओम बिर्ला यांनी जेपीसीला मुदतवाढ मिळेल, असं संकेत दिले होते. सरकारमधील मोठा मंत्री जगदंबिका पाल यांना सूचना देत असल्याचं म्हटलं.

# ‘विकसित भारत यंग लीडर्स’ चर्चासत्रात युवकांनी सहभाग घेण्याचे आवाहन

## राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ अंतर्गत उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : केंद्र सरकारमार्फत राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ उपक्रमांतर्गत ‘विकसित भारत यंग लीडर्स’ चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमांत जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.

या उपक्रमांत देशभरातून निवडलेल्या तीन हजार तरुण व तरुणी दि. १२ ते १३ जानेवारी २०२५ रोजी नवी दिल्ली येथे पंतप्रधानांसमोर विकसित भारताचे व्हिजन मांडता येणार



आहे. चर्चासत्रकाळात तरुणांना देशविदेशातील तरुण आयकॉन्ससोबत चर्चा करण्याची आणि शिकण्याची संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश देशभरातील तरुण नेतृत्व प्रतिभेचा शोध घेणे आणि त्यांचे संगोपन करणे, विकसित भारताविषयी त्यांची दृष्टी स्पष्ट करण्यासाठी तरुणांना एक प्रभावी व्यासपीठ मिळणार आहे. सर्वोच्च निर्णय घेणारे आणि प्रसिध्द जागतिक आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांशी जोडल्या जाणार आहे. विकसित भारताचे नेतृत्त्व करण्यासाठी तरुणांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट आहे.

चार टप्प्यात होणार निवड

विकसित भारत यंग लीडर्स चर्चासत्राच्या माध्यमातून या तरुणांची चार टप्पयात निवड केली जाणार आहे. पहिला टप्पा विकासित भारत प्रश्नमंजुषा ही ऑनलाईन पध्दतीने आयोजित केली जाईल. यात १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक पोर्टलवर नोंदणी करुन भाग घेऊ शकणार आहेत.

पहिल्या टप्प्यात निवडलेले युवक दुसऱ्या टप्प्यातील विकासित भारत ब्लॉग, निबंध स्पर्धेत सहभागी होतील. निवडक युवक तिसऱ्या टप्प्यातील विकसित भारत राष्ट्रीय पिच डेक–स्टेट चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होतील. तिसऱ्या टप्प्यातील विजेते अंतिम टप्प्यातील विकसित भारत राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होतील. पहिला टप्पा २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत भारत सरकारच्या पोर्टलवर आयोजित केलेला आहे.

राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ अंतर्गत विकासित भारत यंग लीडर्स चर्चासत्रामध्ये जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी सहभाग घ्यावा. या उपक्रमांत सहभागी होण्यासाठी दि. ५ डिसेंबर २०२४ पर्यंत ूलहरीरी.सीं. ळप या पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खळबळजनक! अमरावतीतील अकोली परिसरात आढळला मुंडके छाटलेला मृतदेह

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : राज्यभरात खून, मर्डर, चोरी, अत्याचार, आत्महत्या असे गुन्हेगारीचे प्रकार वाढत चालले असताना अमरावतीत धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. अमरावतीतील अकोली परिसरात स्थानिक खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या अंतर्गत स्मशानभूमीजवळ मुंडके छाटलेला मृतदेह आढळला आहे. यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलीस घटनेचा तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काल दुपारी ही घटना उघडकीस आली. खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अकोली स्मशान भूमिजवळ अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला. धड आणि शिर वेगळं आढळलंय. दिवसा ढवळ्या घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. शालिकराम यादव यांच्या शेताजवळ हा मृतदेह आढळला.

दरम्यान, मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी तो मृतदेह ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या शवागारात पाठविला आहे. जुन्या वैमनस्यातून ही हत्या निर्दयीपणे करण्यात आल्याचे सकृत दर्शनी दिसून येत आहे. तसेच मारेकऱ्यांनी खून करु मृताची ओळख पटू नये, यासाठी मुंडकं उडवल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## राज कुंद्राच्या घरावर ईडीची छापेमारी, पॉर्नोग्राफी प्रकरणात छापेमारी करण्यात आल्याची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी** : अंमलबजावणी संचालनालयाने म्हणजेच एऊ ने राज कुंद्राच्या घरावर आणि कार्यालयासह त्यांच्या निकटवर्तीयांवर छापे टाकलेत. पोर्नोग्राफीप्रकरणी ईडीने ही कारवाई केल्याची माहिती समोर आलीय. ईडीने राज कुंद्राच्या घरावर, कार्यालयासह अन्य ठिकाणी हे छापे टाकलेत. पॉर्नोग्राफीप्रकरणी राज कुंद्राला अटक करण्यात आली होती. सध्या राज कुंद्रा जामिनावर बाहेर आहे. आता याच प्रकरणात पुन्हा छापेमारी करण्यात आल्याचं म्हटलं जातंय. मिळालेल्या माहितीनुसार, ईडीच्या टीमने या प्रकरणी एकूण मुंबई आणि उत्तर प्रदेशसह १५ ठिकाणी छापे टाकलेत. मोबाईल ॲप्लिकेशन्स आणि इतर माध्यमांना अील व्हिडीओ पुरवण्यात संशयित म्हणून राज कुंद्रा यांची चौकशी केली जात असल्याचं सांगितलं जातंय.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना ; बालकांचे बँक खाते आधार सीडिंग करण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी** : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेसाठी बालकांचे बँक खाते आधार सीडिंग करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

बालकांचे बँक खाते आधार सीडिंग करण्यासाठी लाभार्थी बालकाचे वय १० वर्षाच्या आत असावे. त्या बालकांचे पालकांसोबत संयुक्त खाते उघडुन त्या खात्याशी बालकाचा आधार क्रमांक सीडिंग करण्यात यावा. तसेच ज्या बालकांचे वय १० वर्षापेक्षा जास्त आहे. अशा बालकांचे स्वतंत्र बँक खात्याशी सीडिंग नसल्यास या योजनेचा लाभ बँक खात्यामध्ये जमा होणार नाही.

याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बस स्टॅंडच्या पाठीमागे, मुट्ठे–ले–आऊट, जोशी नेत्रालय जवळ, बुलडाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला बाल विकास अधिकारी अमोल ज्ञा. डिघुळे यांनी केले आहे.

## काश्मिरी विद्यार्थ्यांचा राज्यपालांशी संवाद

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्रीय गृह मंत्रालयाच्या ’मेरा युवा भारत : वतन को जानो’ कार्यक्रमांतर्गत मुंबई भेटीवर आलेल्या काश्मीरच्या १२५ युवक–युवतींनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे भेट घेऊन त्यांचेशी संवाद साधला. नेहरू युवा केंद्र संघटन संस्थेतर्फे या मुंबई भेटीचे आयोजन करण्यात आले.

काश्मीर हा भारतातील सर्वात सुंदर प्रदेश आहे व जीवनात एकदा तरी काश्मीरला भेट देण्याची इच्छा प्रत्येक भारतीयाला असते असे सांगून एम. जी. रामचंद्रन यांच्या तामिळ चित्रपटात आपणास काश्मीरचे दर्शन घडल्यापासून आपण काश्मीरला भेट देण्याचे स्वप्न बाळगून असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

विविध प्रदेशांना भेट दिल्यास आपण परस्परांना चांगले समजून घेऊ शकतो असे राज्यपालांनी सांगितले. या दृष्टीने काश्मीरच्या युवकांची महाराष्ट्र भेट परस्पर सबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरेल असे राज्यपालांनी सांगितले. काश्मीर हा भारताचा अभिन्न भाग असून पुढे देखील राहील असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले. आपण सर्वांनी एक देश म्हणून एकत्र राहिल्यास जगातील कोणतीही महाशक्ती आपल्याला आव्हान देऊ शकणार नाही, असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी श्रीनगर, अनंतनाग, कुपवाडा, बारामुल्ला, बडगाम व पहलगाम या जिल्ह्यातील युवक–युवतींनी राज्यपालांशी संवाद साधला. कार्यक्रमाला नेहरू युवा केंद्र संघटनांचे राज्य संचालक प्रकाश मनुरे, जिल्हा युवक अधिकारी निशांत रौतेला व इतर उपस्थित होते. या भेटीनंतर काश्मिरी युवकांनी राजभवनातील क्रांतिकारकांच्या दालनाला भेट दिली.

## मेहकर तालुक्यातील बंद पाणी फिल्टर त्वरीत सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन

### महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेचा बीडीओंना निवेदनाद्वारे इशारा



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये बसविण्यात आलेले पाणी फिल्टर बंद असून ते त्वरीत सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल,असा इशारा महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे यांनी मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजी निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात नमुद केले आहे की, मेहकर तालुक्यामध्ये पिण्याचे पाणी दूषित असल्याने शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून शहरी व ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायतमध्ये जनतेला सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून पाणी फिल्टर बसवून शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर पाणी फिल्टर व्यवस्था काही दिवस सुरळीत चालू होती. नंतर लगेचच पाणी फिल्टर बंद पडले असून ते निकामी होत धूळखात पडलेले आहेत. नागरिकांना पिण्याचे पाणी शुद्ध मिळावे, यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. तरी सुद्धा नागरिकांना शुद्धा पिण्याच्या पाण्याची समस्या कायम आहे. सदर पाणी फिल्टर बंद असून याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी जनतेचे आरोग्य दुषित पाण्यामुळे धोक्यात आले आहे. याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष न देणे ही चिंताजनक बाब आहे.तरी तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये बंद असलेले पाणी फिल्टर त्वरीत सुरू करून जनतेला स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे, बंद असलेले पाणी फिल्टर त्वरीत सुरु न केल्यास महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेच्या वतीने मेहकर तालुक्यामध्ये तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन मेटागळे यांनी मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दि.२९ नोव्हेंबर रोजी नवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनाच्या प्रतिलिपी बुलढाणा जिल्हाधिकारी,मेहकर उपविभागीय अधिकारी, मेहकर तहसीलदार,मेहकर पोलीस स्टेशनचे निरीक्षक, डोणगाव पोलीस स्टेशनचे निरीक्षक यांना दिल्या आहेत.निवेदनावर जिल्हाध्यक्ष गजानन मेटागळे यांची स्वाक्षरी आहे.




## विविध वृत्त...

### जिल्हा कारागृहात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : कारागृहातील बंद्यांसाठी जिल्हा कारागृह वर्ग–२ येथे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक संदिप पा. भुतेकर तर जिल्हा क्षयरोग अधिकरी डॉ. वर्षा गुट्टे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात डॉ. वर्षा गुट्टे यांनी बंद्यांसाठी क्षयरोगाबाबत मार्गदर्शन केले तर करुणा घोडेस्वर यांनी बंद्यांना एड्स या रोगाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी बंद्यांचे तपासणीसाठी नमुने घेण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्षयरोग अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा समन्वयक डॉ. सिध्देश्र्वर सोळंकी, वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक राजेंद्र सुरडकर, जिल्हा समन्वयक अनिल सोळंके, आरोग्य सहाय्यक राजेंद्र सरोदे, मेघा बाहेकर तसेच वरिष्ठ तुरुंग अधिकारी व कारागृह कर्मचारी यांनी योगदान दिले.

### विभागीय लोकशाही दिनाचे ९ डिसेंबर रोजी आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी ९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तसेच नियमित विभागीय लोकशाही दिन संपल्यानंतर विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र–१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. विहित नमुना अर्ज प्रप्रत्र–१ (क) आवक शाखेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. विभागीय महिला लोकशाही दिनासाठी पिडीत महिलांनी विहीत नमुन्यातील मुदत पुर्व अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, तथा सदस्य सचिव यांच्याकडे सादर करावेत. अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही.

जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्र्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्र्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्र्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### लिफ्ट सफाई कर्मचाऱ्यांकडून शाळेतील 3 चिमुकलींची छेडछाड, मुंबईतील नामांकित शाळेत ’बदलापूर’सारखी घटना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईच्या भांडुप येथून एक संतापजनक बातमी समोर आली आहे. भांडुपमध्ये असलेल्या एका नामांकित शाळेत पुन्हा एक ’बदलापूर’ सारखीच घटना उजेडात आली आहे. यात लिफ्ट सफाई कर्मचाऱ्यांकडून शाळेतील ३ चिमुकलींची छेडछाड केल्याची घटना घडली आहे. शाळेत योगासन शिकणाऱ्या विद्यार्थीनीसोबत हा संतापजनक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. विद्यार्थीनीनी या बाबत माहिती दिल्याने प्रकार उजेडात आला आणि त्यानंतर पोलिसांमध्ये या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईतील नामांकित शाळेत ’बदलापूर’सारखी घटना

मिळालेल्या माहितीनुसार २७ नोव्हेंबरच्या सकाळी १० ते १.३० वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. यात शाळेच्या बेसमेंटमध्ये १० वर्षीय एक तर ११ वर्षीय दोन विद्यार्थीनी योगा करत होत्या. दरम्यान शाळेतील लिफ्टची सफाई आणि देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून या चिमुकलींची छेडछाड करण्यात आली. त्यानंतर घडलेल्या या प्रकाराची तक्रार विद्यार्थीनीनी योगा शिकणाऱ्या शिक्षिकेसह आपल्या कुटुंबीयांकडे केली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्ष्यात घेता बेसमेंटमध्ये असलेले सीसीटिव्हीची तपासणी केली असता या संपूर्ण प्रकरणाची सत्यता उजेडात आली. धक्कादायक बाब म्हणजे, लिफ्ट ग्राऊंड फ्लोवरवर संपते. मात्र लिफ्टची सफाई आणि देखभाल करणाऱ्या कर्मचारी बेसमेंटमध्ये पडद्याच्यामागे लपल्याचे आढळून आला.